सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ११० | शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com



अमळनेर : पालिकेच्या विशेष सभेत शहर विकास आघाडीच्या स्वीकृत सदस्यपदी डॉ. डिगंबर महाले यांची निवड झाल्यानंतर विजयाचा जल्लोष करताना 'शविआ'च्या सौ. जयश्रीताई पाटील यांच्यासमवेत नगरसेवक, नगरसेविका व कार्यकर्ते.

# अमळनेरच्या उपनगराध्यक्षपदी प्रशांत निकम बिनविरोध

## स्वीकृत सदस्यपदी डॉ. डिगंबर महाले, मोहन सातपुते, गुलाब पाटील, प्रताप साळी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



प्रशांत निकम
उपनगराध्यक्ष

अमळनेर : येथील पालिकेच्या विशेष सभेत उप-नगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) एकमेव नगरसेवक प्रशांत निकम यांची शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी बिनविरोध निवड झाली. तर स्वीकृत सदस्यपदी शहर विकास आघाडीतर्फे डॉ. डिगंबर महाले, शिवसेना गटातर्फे मोहन सातपुते व गुलाब पाटील, तर अपक्षांच्या गटातर्फे प्रताप साळी यांची निवड झाली. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर पीठासन अधिकारी होते. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी यांनी त्यांना सहकार्य केले.

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ मधील कलम ५१- अ (१- अ) उपकलम ९ नुसार नगराध्यक्ष व सदस्य निवडून आल्यानंतर २५ दिवसांच्या आत उपनगराध्यक्षाची निवड करणे बंधनकारक आहे.



डॉ.डिगंबर महाले
स्वीकृत नगरसेवक



मोहन सातपुते
स्वीकृत नगरसेवक



गुलाब पाटील
स्वीकृत नगरसेवक



प्रताप साळी
स्वीकृत नगरसेवक

तसेच कलम ५१- ब नुसार नामनिर्देशित (स्वीकृत) सदस्यांच्या निवडीसाठी सभा घेणे आवश्यक असते. या पार्श्वभुमीवर नगराध्यक्ष तथा पीठासन अधिकारी डॉ. बाविस्कर यांनी ही प्रक्रिया पार पाडली.या विशेष सभेत चार स्वीकृत नगरसेवका-चीही अधिकृत घोषणा करण्यात आली. यात डॉ. डिगंबर महाले, गुलाब पाटील, मोहन सातपुते व प्रताप साळी यांचा समावेश आहे.

यावेळी मुख्याधिकारी श्री. शिंदे व नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांच्या हस्ते नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष व नवनियुक्त स्वीकृत नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. सभेनंतर पालिका कार्यालयाबाहेर ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष करण्यात आला. उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांना नागरिक, कार्यकर्ते व समर्थकांनी प्रत्यक्ष भेटी देवून शुभेच्छांचा वर्षाव केला.



अमळनेर : शिवसेनेतर्फे मोहन सातपुते तर 'शविआ'तर्फे डॉ. डिगंबर महाले यांची स्वीकृत नगरसेवकपदी निवडीनंतर सभागृहाबाहेर त्यांना खांद्यावर उचलून जल्लोष करताना समर्थक.



अमळनेर : उपनगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सभागृहात आभार मानताना प्रशांत निकम.



अमळनेर : पालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी निवडीनंतर डॉ. डिगंबर महाले यांचा सत्कार करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे विश्वस्त तसेच मंगल परिवारातील सेवेकरी. (छायाचित्रे : मयूर चौधरी)


# प्रवाशांच्या जीवाशी खेळ

## अमळनेर- चोपडा रस्त्याची दयनीय अवस्था

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील फरशी पुलापासून ते चोपडा रोडवरील स्मशान भूमीपर्यंतच्या रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. याकडे पालिका प्रशासनाने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

अमळनेर- चोपडा रस्त्यावर रोज मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. विशेष म्हणजे या रस्त्यावर ख्यातनाम श्री मंगळग्रह मंदिर, शनी मंदिर आहे. रोज भाविकांची मोठी गर्दी असते. मात्र, त्यांना देव दर्शनासाठी जाताना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. दोन महिन्यापूर्वी सलग दोन वेळा फरशी पुलावरील खड्डे बुजविण्यात आले. गेल्या महिन्यात स्मशानभूमी जवळील खड्डे बुजविण्याचे काम मोठ्या गाजावाजात करण्यात आले. मात्र, हे काम निकृष्ट झाले. या



रस्त्यावर पुन्हा खड्डे पडल्याने किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढले आहे. सायंकाळी अवजड वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडते. याचा वाहनधारकांना व परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. या रस्त्यावरून विद्यार्थी-विद्यार्थिनींचाही मोठ्या प्रमाणावर वापर आहे. रुग्णवाहिका, मालवाहू गाड्यांची ये- जा सुरू असते. मात्र, रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे त्यांच्या जीवास धोका निर्माण झाला आहे. तात्पुरत्या मलमपट्टीऐवजी या रस्त्याचे कायमस्वरूपी दर्जेदार काम व्हावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

आजचे अभीष्टचिंतन



श्री. सुभाषदादा भांडारकर
माजी नगराध्यक्ष



श्री. नितीन सोनार
अमळनेर



श्री. गोपाल सांगोले
अमळनेर



श्री. मनोज सैंदाणे
अमळनेर

## दिनविशेष

१० जानेवारी

- पुण्यातील शनिवारवाड्याचे बांधकाम सुरू झाले
- बॉम्बे बरोडा अँड सेंट्रल इंडिया रेल्वे या ब्रिटिशकालीन रेल्वे कंपनीचे चर्चगेट रेल्वे स्थानक सुरू झाले
- भारत व पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार झाला.


**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!





# मोहम्मद रफी के लिए लिखा गया था गाना, बाद में किशोर कुमार की आवाज में हुआ अमर



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

किशोर कुमार और मोहम्मद रफी हिंदी सिनेमा के सबसे बेहतरीन गायकों में से एक रहे थे। क्या आपको ये जानकारी है कि एक सैड सॉन्ग जिसके लिए बतौर सिंगर पहली पसंत...

पुराने जमाने के यादगार नगमों में ज्यादातर आवाज किशोर कुमार और मोहम्मद रफी की सुनने को मिलती है। बेशक आज ये दोनों हमारे बीच नहीं हैं, लेकिन इनके शानदार गीतों को आज भी सुना जाता है। रफी साहब और किशोर दा असल जिंदगी में काफी अच्छे दोस्त भी हुआ करते थे। आज हम आपको इन दोनों से जुड़ा एक रोचक किस्सा बताने जा रहे हैं, जब एक गाना को मोहम्मद रफी के लिए लिखा गया था, लेकिन बाद में इस गीत की आवाज किशोर कुमार बने और ये सॉन्ग मौजूदा समय में भी बेस्ट सैड सॉन्ग की कैटेगरी में आता है। आइए जानते हैं कि यहां किस गाने के बारे में जिक्र किया जा रहा है।

**किशोर कुमार ने गाया था ये गाना**

साल १९७३ में निर्देशक रघुनाथ झालानी के डायरेक्शन में बनी फिल्म अनामिका सिनेमाघरों में रिलीज किया गया था। इस मूवी की रिलीज से पहले संगीतकार आर. डी. बर्मन से डायरेक्टरने एक सैड सॉन्ग की डिमांड की थी। आईएमडीबी की रिपोर्ट के अनुसार पंचम दा ने वह गाना सिंगर मोहम्मद रफी को जेहन में रखते हुए तैयार किया और उसका म्यूजिक बनाया। आर डी बर्मन की तर्ज पर गीतकार मजरूह सुल्तानपुरी ने भी रफी साहब को सोच में रखते हुए गाने की लाइन लिखीं।

लेकिन ऐन मौके पर मोहम्मद रफी संग बात नहीं बन पाई और अंत में फिल्म अनामिका का मेरी भीगी भीगी सी... गाना किशोर कुमार के हाथों में गाया और किशोर दा ने अपनी दर्दभरी आवाज से इस गीत को कल्ट बना दिया। ५३ साल बाद भी ये गाना खूब सुना जाता है और श्रोता इसे **अपनी प्लेलिस्ट में शामिल रखते हैं।** फिल्म अनामिका के इस गीत को अभिनेता संजीव कुमार और जया बच्चन पर फिल्माया गया था। किशोर कुमार के बेस्ट सैड सॉन्ग के तौर पर इस मेरी भीगी भीगी सी का जिक्र किया जाता है। गाने के मुखड़े से लेकर अंतरे तक सबकुछ काफी शानदार माना जाता है।

**किशोर कुमार ने गाए इतने गाने**

३ दशक से लंबे सिंगिंग करियर के दौरान बतौर सिंगर किशोर कुमार ने १६ हजार से ज्यादा गानों को अपनी आवाज दी थी, जिनमें करीब २८०० हिंदी सॉन्ग भी शामिल रहे थे। इस दौरान वह राजेश खन्ना और अमिताभ बच्चन जैसे कई सुपरस्टार्स की आवाज बने थे।

# टॅक्सी ड्रायव्हरची मुलगी ते आयएएस ऑफिसर!

## सक्सेस स्टोरी प्रत्येकाला प्रेरणा देणारा सी. वनमती यांचा प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सी. वनमती, एका सामान्य कुटुंबातून आलेल्या आणि वडिलांच्या टॅक्सी व्यवसायातून आलेल्या आहेत. त्यांनी अनेक अडचणींवर मात केली. चौथ्या प्रयत्नात यूपीएससी परीक्षेत यश मिळवून त्या आयएएस अधिकारी बनल्या. आज त्या महाराष्ट्रात जॉइंट कमिशनर म्हणून कार्यरत आहेत. त्यांची कहाणी लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. जिद्द आणि मेहनतीने कोणतेही स्वप्न पूर्ण होऊ शकते हे त्यांनी दाखवून दिले.

आयएएस सी. वनमती तमिळनाडूच्या एका सामान्य कुटुंबातून येतात. त्या वडिलांच्या टॅक्सी ड्रायव्हरच्या व्यवसायातून आर्थिक अडचणींवर मात करत चौथ्या प्रयत्नात यूपीएससी २०१५ मध्ये एआयआर १५२ रँक मिळवून आयएएस अधिकारी बनल्या. आज त्या महाराष्ट्रात स्टेट टॅक्स विभागाच्या जॉइंट कमिशनर (एनफोर्समेंट) म्हणून कार्यरत आहेत आणि लाखो तरुणांसाठी प्रेरणास्रोत ठरल्या आहेत.

सी. वनमती यांची कहाणी संघर्ष आणि मेहनतीचे प्रतीक आहे. त्यांनी लहानपणी म्हशी चरायला नेल्या आणि घरकामातही हातभार लावला. या कठीण परिस्थितीतही त्यांच्या पालकांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. वनमती यांनीही अभ्यासावर आणि मेहनतीवर कधीही लक्ष केंद्रित करणे सोडले नाही. नातेवाईकांच्या लग्नाच्या दबावामुळेही वनमती यांनी आपले शिक्षण सुरू ठेवले आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यांना एका महिला कलेक्टरला पाहून आणि 'गंगा यमुना सरस्वती' या टीव्ही मालिकेमुळे आयएएस बनण्याची प्रेरणा मिळाली. येथूनच त्यांनी एक दिवस देशाची सेवा करण्यासाठी अधिकारी बनण्याचा निश्चय केला.

**जिद्द आणि मेहनतीचे फळ**

यूपीएससीचा मार्ग वनमतींसाठी सोपा नव्हता. त्या तीन वेळा परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्या, पण त्यांनी हार मानली नाही. अखेरीस, चौथ्या प्रयत्नात २०१५ च्या नागरी सेवा परीक्षेत त्यांनी एआयआर १५२ रँक मिळविली आणि त्या आयएएस अधिकारी बनल्या. आज सी. वनमती महाराष्ट्र कॅडरमध्ये कार्यरत आहेत. त्या स्टेट टॅक्स विभागाच्या जॉइंट कमिशनर (एनफोर्समेंट) या पदावर सेवा देत आहेत. त्यांचा हा प्रवास सिद्ध करतो की जर जिद्द आणि मेहनत असेल, तर कोणतेही स्वप्न अपूर्ण राहत नाही.



### लाखो तरुणांसाठी प्रेरणा

एका सामान्य कुटुंबातून येणाऱ्या वनमती यांनी बालपणीच्या अडचणी, आर्थिक तंगी आणि सामाजिक दबाव यांना दुर्लक्षित करून यूपीएससी परीक्षेत यश मिळविले आणि लाखो तरुणांसाठी प्रेरणा बनल्या. एका व्हिडिओ मुलाखतीनुसार सी. वनमती यांचे बालपण खूप सामान्य होते. त्यांचे वडील टॅक्सी ड्रायव्हर होते आणि आर्थिक परिस्थिती खूपच कमकुवत होती. वनमती यांनी बालपणी म्हशी चरायला नेल्या आणि घरकामात कुटुंबाला मदत केली. परंतु या कठीण परिस्थितीतही पालकांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. त्याचे फळ त्यांना मिळाले आहे.

# त्वचा घट्ट करण्याचे उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

त्वचा सुंदर आणि तरुण राहावी अशी प्रत्येकाची इच्छा असते. परंतु अनेक वेळा वयाच्या आधी त्वचा सैल होऊ लागते. चेहऱ्याची त्वचा अकाली सैल होऊ लागते आणि ती कशी घट्ट करावी हे जाणून घेऊया. पुढील कारणांमुळे त्वचा सैल होऊ शकते- सूर्यप्रकाशाचा दीर्घकाळ संपर्क, आरोग्यदायी अन्न न खाणे, वाढत्या वयामुळे त्वचेतील ऊती कमी होऊन त्यांच्यातील लवचिकता आणि घट्टपणा कमी होऊ लागतो, जास्त मेकअप, जास्त धूम्रपान करणे. घरगुती उपाय सामान्यतः चेहऱ्यासाठी खूप फायदेशीर मानले जातात. अशा परिस्थितीत त्वचा घट्ट करण्यासाठी काही घरगुती उपायांचा अवलंब केला जाऊ शकतो.

मोहरीचे तेल : मोहरीच्या तेलात कॅरोटीनॉइड्सचे प्रमाण जास्त असते. हे वृद्धत्व विरोधी गुणधर्म प्रदर्शित करू शकते, ज्यामुळे त्वचेवरील सुरकुत्या कमी होऊ शकतात. याशिवाय, ते त्वचा तसेच ऊतींना निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यामुळे त्वचा घट्ट राहते. यासाठी दररोज आंघोळीपूर्वी त्वचेवर मोहरीच्या तेलाची मालिश करू शकता.

आर्गन तेल : आर्गन ऑइल हे त्वचेसाठी फायदेशीर मानले जाते. या तेलात वृद्धत्व विरोधी गुणधर्म असतात, त्यामुळे ते त्वचेची लवचिकता सुधारू शकते आणि ते सैल होण्यापासून रोखू शकते. यासाठी बॉडी लोशन मध्ये आर्गन ऑइल मिसळा आणि त्यानंतर त्वचेला मसाज करा.

ॲवोकॅडो तेल : ॲवोकॅडो तेलाचा वापर त्वचा घट्ट करण्यासाठी देखील केला जाऊ शकतो. वास्तविक, ॲवोकॅडो तेल त्वचेमध्ये उपस्थित कोलेजन वाढवू शकते. एवढंच नाही तर आर्गन ऑइल प्रमाणे यात अँटी एजिंग प्रभाव देखील असतो, जो सुरकुत्या कमी करण्यास मदत करतो. यासाठी दररोज ॲवोकॅडो तेलाने त्वचेला मसाज करा आणि त्यानंतर दोन तासांनी त्वचा धुवा.

बदाम तेल : बदामाच्या तेलात इमोलियंट आणि स्क्लेरोसंट सारखे गुणधर्म असतात. हे केवळ त्वचेच्या पेशींचे पुनरुज्जीवन करण्यातच मदत करत नाहीत तर त्वचेचा टोन देखील सुधारू शकतात. हा गुण त्वचा घट्ट ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. यासाठी अंघोळीच्या अर्धा तास आधी नियमितपणे बदामाच्या तेलाने त्वचेची मालिश करा.

ऑलिव तेल : ऑलिव्ह ऑइलचा वापर त्वचा सैल होण्यापासून रोखण्यासाठी होतो. ऑलिव्ह ऑइल मध्ये सेकोइरिडॉइड नावाचे पॉलिफेनॉल असते, जे वृद्धत्व विरोधी गुणधर्म प्रदर्शित करते. या गुणामुळे त्वचेवरील सुरकुत्या कमी होतात. यासाठी दररोज आंघोळीनंतर त्वचेला ऑलिव्ह ऑईलने मसाज करावा.

# कितीही कमी खाल्ले तरी जेवण होताच पोट फुगते–गॅसेस होतात?

## ' हा ' घरगुती आयुर्वेदिक उपाय करून पाहा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पोटात गॅस होणे किंवा पोट फुगणे ही आजकाल खूपच सामान्य समस्या आहे. बहुतेक लोकांना ही तक्रार जेवणानंतर जाणवते. जेव्हा आपली पचनसंस्था नीट काम करत नाही किंवा आपण चुकीचे अन्न खातो, तेव्हा गॅस, जडपणा आणि अस्वस्थता सुरू होते. या त्रासातून आराम मिळवण्यासाठी बरेच लोक औषधे घेतात, पण अनेकदा त्याचा परिणाम होत नाही. अशा वेळी आयुर्वेदिक घरगुती उपाय अतिशय प्रभावी ठरतात.

**आयुर्वेदिक उपाय**

डॉक्टर रॉबिन शर्मा यांनी आपल्या इंस्टाग्रामवर पोटात गॅस होण्याच्या समस्येसाठी एक सोपा पण प्रभावी उपाय सांगितला आहे. त्यांचं म्हणणं आहे की या उपायाचा परिणाम पहिल्याच वेळी दिसू शकतो.

**साहित्य**

अर्धा छोटा चमचा गायीचे तूप.

२ चिमूट सैंधव मीठ २ चिमूट हिंग.

**कृती आणि सेवन करण्याची पद्धत**

एका छोट्या भांड्यात अर्धा चमचा गायीचे तूप घ्या. त्यात २ चिमूट सैंधव मीठ आणि २ चिमूट हिंग घाला. सर्व नीट मिसळून एक लहान चटणीसारखे मिश्रण तयार करा. हे मिश्रण जेवण करण्यापूर्वी लगेच खा. ज्यांना गॅस, पोट फुगणे किंवा अफारा होतो त्यांच्यासाठी हा उपाय अत्यंत फायदेशीर आहे.

**हिंगाचे फायदे**

हिंग पचनासाठी आवश्यक एन्झाईम्स सक्रिय करते. ज्यामुळे अन्न पटकन पचते. हे आतड्यांचे कार्य सुधारते. हिंग गॅस, पोटदुखी, आम्लपित्त आणि बद्धकोष्ठता यावर उपयोगी आहे.

**सैंधव मिठाचे फायदे**

सैंधव मीठ पचनसंस्था मजबूत करते. हे आतड्यातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते. यामुळे भूक वाढते आणि अपचन, पोट फुगणे यासारख्या तक्रारी कमी होतात. हा उपाय दिवसातून फक्त एकदाच जेवणाआधी घ्यावा. जर समस्या कायम राहिली, तर डॉक्टर किंवा आयुर्वेदिक तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.







हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



अमळनेर : हिवाळी क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी मुख्याध्यापक व्हि. व्ही. पाटील, ए. डी. भदाणे, विनोद कदम सर आदी.

# जी. एस. हायस्कूलमध्ये हिवाळी क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील जी. एस. हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते हिवाळी क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन झाले. यावेळी उपमुख्याध्यापक ए. डी. भदाणे, ज्येष्ठ शिक्षक के. पी. पाटील, क्रीडा शिक्षक जे. व्ही. बाविस्कर, विनोद कदम सर आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापक पाटील यांनी सांगितले, की क्रीडा स्पर्धा या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. खेळातून संघभावना, शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि जिद्द निर्माण होते. विजय-पराजय स्वीकारण्याची वृत्ती तसेच निरोगी स्पर्धात्मकता विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देते. दरम्यान, विविध क्रीडा स्पर्धांना सुरुवात झाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी कबड्डी, खो-खो, मल्लखांब आदी क्रीडा स्पर्धा झाल्या. मैदानी खेळांमूळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



अमळनेर : स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल खा.शि. मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष विनोद अग्रवाल, शामशेठ गोकलाणी व मित्र परिवार .



अमळनेर : डॉ. डिगंबर महाले यांची स्वीकृत नगरसेवकपदी निवडीनंतर शामची आई हे पुस्तक भेट देताना मुख्याधिकारी गणेश शिंदे.



अमळनेर : स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल खा.शि. मंडळाचे नवनिर्वाचित संचालक पंकज मुंदडे व मित्र परिवार.

वाचा...!
दै. ग्लोबल महातेज
आजच आपला अंक राखून ठेवा















## कालाष्टमी विशेष

# संकटांवर मात करणारा श्रद्धेचा उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मपरंपरेत प्रत्येक तिथीला एक विशिष्ट आध्यात्मिक महत्त्व असते. त्यातीलच एक अत्यंत महत्त्वाची तिथी म्हणजे कालाष्टमी. ही तिथी भगवान शंकर यांचे उग्र स्वरूप असलेल्या श्री भैरवनाथांना समर्पित आहे. मार्गशीर्ष, पौष, माघ आदी महिन्यांतील कृष्ण पक्षातील अष्टमीला कालाष्टमी साजरी केली जाते. १० जानेवारी २०२६ रोजी ही पवित्र तिथी येत असून, या दिवशी भैरवनाथांच्या उपासनेला विशेष महत्त्व आहे.

पौराणिक कथेनुसार एकदा ब्रह्मदेवांनी अहंकारवश होऊन स्वतःला सर्वश्रेष्ठ समजले. त्यांचा हा अहंकार नष्ट करण्यासाठी भगवान शंकर यांनी भैरव रूप धारण केले. या उग्र स्वरूपाने ब्रह्मदेवांचा एक मस्तक छिन्न केला. त्यामुळेच भैरवाला 'कपालधारी' असेही म्हटले जाते. हा प्रसंग अधर्म, अहंकार आणि अन्याय नष्ट करण्याचे प्रतीक मानला जातो. त्यामुळेच कालाष्टमी ही अहंकार त्याग, आत्मपरीक्षण आणि आध्यात्मिक जागृतीची तिथी समजली जाते. या दिवशी भाविक पहाटे लवकर उठून स्नान करून भैरवनाथांची पूजा करतात. काळ्या तिळाचे लाडू, उडीदडाळीचे पदार्थ, नारळ, फुले आणि धूप-दीप अर्पण केला जातो. काही ठिकाणी उपवासाचेही विशेष महत्त्व आहे. उपवास केल्याने मनाची शुद्धी होते, नकारात्मक विचार दूर होतात आणि आत्मिक बळ वाढते, असे मानले जाते. कालाष्टमी केवळ धार्मिक विधींपुरती मर्यादित नाही, तर ती जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारी तिथी आहे. भैरवनाथ हे न्याय, संरक्षण आणि निर्भयतेचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या उपासनेने संकटे दूर होतात, भीती कमी होते आणि आत्मविश्वास वाढतो, अशी भक्तांची श्रद्धा आहे. विशेषतः शत्रूत्रास, मानसिक अस्वस्थता, अपयश, आर्थिक अडचणी यांपासून मुक्तीसाठी कालाष्टमीची पूजा प्रभावी मानली जाते. आजच्या धावपळीच्या युगात माणूस सतत तणावाखाली जगतो. अशा वेळी कालाष्टमी आपल्याला अंतर्मुख होण्याची संधी देते. स्वतःतील अहंकार, राग, मत्सर आणि नकारात्मकता दूर करून संयम, करुणा आणि श्रद्धेचा मार्ग स्वीकारण्याचा संदेश ही तिथी देते.

कालाष्टमी हा केवळ एक धार्मिक दिवस नसून तो आत्मशुद्धीचा, आत्मबळाचा आणि नवचैतन्याचा उत्सव आहे. या पवित्र दिवशी भैरवनाथांचे स्मरण करून आपणही आपल्या जीवनातील अंधार दूर करून प्रकाशाकडे वाटचाल करावी, हाच या तिथीचा खरा अर्थ आहे.



## शनी देवाला प्रसन्न करण्यासाठी मंत्र

शनी देवाला प्रसन्न करण्यासाठी आणि त्यांच्या पीडेपासून मुक्ती मिळविण्यासाठी विविध शनी मंत्र उपलब्ध आहेत.

– **सामान्य मंत्र :** ओम शं. शनैश्चराय नमः

– **पौराणिक/नमस्कार मंत्र :** नीलांजनसमाभासं रविपुत्रं यमाग्रजम् ।
छायामार्तण्डसम्भूतं तं नमामी शनैश्चरम्॥

– **बीज मंत्र :** ओम प्रां प्रीं प्रौं सः शनैश्चराय नमः

शनी गायत्री काकध्वजाय विद्महे खड्गहस्ताय धीमहि।
तन्नो मन्दः प्रचोदयात॥

# हनुमानजींच्या जीवनातील पाच कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वाल्मिकी रामायणाशिवाय जगभरातील रामायणात हनुमानजींशी संबंधित शेकडो कथांचे वर्णन आढळते. त्यांच्या बालपणापासून ते कलियुगापर्यंतच्या हजारो कथा वाचायला मिळतात. हनुमानजींना कलियुगातील संकट निवारक देवता म्हटले आहे. केवळ त्याची भक्ती फलदायी असते. चला जाणून घेऊया असे कोणते पाच प्रसंगी आहेत जे आजही प्रचलित आहेत.

**१) चारों जुग परताप तुम्हारा :** लंकावर विजय मिळवून अयोध्या परतल्यावर जेव्हा श्रीराम त्यांना युद्धात मदत करणारे विभीषण, सुग्रीव, अंगद इतरांना कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून भेटवस्तू देतात तेव्हा हनुमानजी श्री रामाची प्रार्थना करतात.– 'यावद् रामकथा वीर चरिष्यति महीतले। तावच्छरीरे वत्स्युन्तु प्राणामम न संशयः।।'

**अर्थात :** 'हे वीर श्रीराम. जोपर्यंत या पृथ्वीतलावर रामाची कथा प्रचलित होत राहील, तोपर्यंत माझा प्राण या देहात वास करावा.' यावर श्रीराम त्यांना आशीर्वाद देतात– 'एवमेतत् कपिश्रेष्ठ भविता नात्र संशयः। चरिष्यति कथा यावदेषा लोके च मामिका तावत् ते भविता कीर्तिः शरीरे प्यवस्तथा। लोकाहि यावत्स्थास्यन्ति तावत् स्थास्यन्ति में कथा।'

**अर्थात :** 'हे कपिश्रेष्ठ, असेच घडेल, यात शंका नसावी. जोपर्यंत माझी कथा जगात प्रचलित आहे, तोपर्यंत तुझी कीर्ती अमीट राहील आणि तुमच्या शरीरात प्राण राहतील जोपर्यंत हे लोक बनले राहतील तोपर्यंत माझी कथा देखील स्थिर राहील.' चारों जुग परताप तुम्हारा, है परसिद्ध जगत उजियारा।।

**२) संजीवनी पर्वत दोनदा उचलले :** बालपणी एकदा हनुमानजींनी देवगुरू बृहस्पतीच्या आज्ञेवरून वडिलांसाठी समुद्रातून संजीवनी पर्वत आणला. हे पाहून त्याची आई खूप भावूक होते. यानंतर राम-रावण युद्धात रावणाचा पुत्र मेघनाद याने शक्तीबाणाचा वापर केला तेव्हा लक्ष्मणासह अनेक वानर बेहोश झाले. जामवंताच्या सांगण्यावरून हनुमानजी संजीवनी वनौषधी घेण्यासाठी द्रोणाचल पर्वताकडे निघाले. वनौषधी ओळखू न आल्याने त्यांनी डोंगराचा एक भाग उचलला आणि परत जाऊ लागले. वाटेत त्याला कालनेमी राक्षसाने अडवले आणि युद्धासाठी आव्हान दिले. कालनेमी हा रावणाचा अनुयायी होता. कालनेमी रावणाच्या सांगण्यावरूनच हनुमानजींचा मार्ग अडविण्यासाठी गेला होता. पण रामभक्त हनुमानाला त्याच्या कपटाची जाणीव झाली आणि त्याने लगेचच त्याचा वध केला.

**३) विभीषण आणि राम यांची भेट घडवून दिली :** जेव्हा हनुमानजी सीतामातेच्या शोधात विभीषणाच्या महालात जातात. विभीषणाच्या महालावर कोरलेली रामाची खूण पाहून ते प्रसन्न होतात. तेथे विभीषण यांना भेटतात. विभीषणला परिचय विचारतात स्वतः रघुनाथाचा भक्त म्हणून ओळख करून देतो. हनुमान आणि विभीषण यांचे दीर्घ संभाषण झाल्यावर हनुमानजींना माहीत पडते की हे कामाची व्यक्ती आहे. यानंतर श्रीराम लंकेवर आक्रमण करण्याच्या तयारीत असताना विभीषणाचा रावणाशी वाद सुरू होता. शेवटी विभीषण राजवाडा सोडतात आणि प्रभू श्रीरामचंद्रांना भेटण्यासाठी आतुरतेने समुद्राच्या या बाजूला येतात. विभीषण येताना पाहून वानरांनी शत्रूचा एक खास दूत असल्याचे जाणून त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवत नाही.

**सुग्रीव म्हणतात–** 'हे रघुनाथजी! ऐका, रावणाच भाऊ भेटायला आला आहे' प्रभू म्हणतात – 'हे मित्र! तुम्हाला काय वाटते ?' वानरराज सुग्रीव म्हणतात **– 'हे नाथ!** राक्षसांची माया कळून येत नाही. इच्छेने रूप बदलणारा हा कोणत्या कारणाने आला आहे हे माहीत नाही.' अशात हनुमानजी सर्वांचे सांत्वन करतात आणि प्रभू श्रीरामचंद्र सुद्धा म्हणतात की आश्रयाची भीती दूर केली पाहिजे हे माझे व्रत आहे. अशाप्रकारे श्रीराम-विभीषणाची भेट हनुमानजींमुळेच निश्चित झाली.

**४) सर्वप्रथम रामायण लिहिले :** धर्मग्रंथानुसार, विद्वानांचे म्हणणे आहे की हनुमानजींनी प्रथम प्रभू श्रीरामचंद्रांची कथा लिहिली आणि तीही आपल्या नखांनी खडकावर. ही रामकथा वाल्मिकींच्या रामायणाच्याही आधी लिहिली गेली होती आणि ती 'हनुमद रामायण' म्हणून प्रसिद्ध आहे. ही घटना घडली तेव्हा प्रभू श्रीरामचंद्र रावणावर विजय मिळविल्यानंतर प्रभू श्रीरामचंद्र अयोध्येत राज्य करू लागले होते आणि श्री हनुमानजी हिमालयात जातात. तेथे ते शिव तपश्चर्येदरम्यान रोज खडकावर नखांनी रामायणाची



कथा लिहीत असे. अशा प्रकारे त्यांनी प्रभू श्रीरामचंद्र यांच्या महिमाचा उल्लेख करणारे 'हनुमद रामायण' रचले.

काही काळानंतर महर्षी वाल्मिकींनीही 'वाल्मिकी रामायण' लिहिले आणि ते लिहिल्यानंतर त्यांना ते भगवान शंकरांना दाखवून त्यांना अर्पण करण्याची इच्छा झाली. ते रामायण घेऊन भगवान शिव यांचे निवासस्थान असलेल्या कैलास पर्वतावर पोहोचले. तेथे त्यांना हनुमानजी आणि त्यांनी लिहिलेले 'हनुमद रामायण' पाहिले. हनुमद रामायण पाहून वाल्मिकी निराश झाले.

वाल्मिकींना निराश बघून हनुमानजींनी त्यांना निराश होण्याचे कारण विचारले तेव्हा महर्षी म्हणाले, की त्यांनी अथक परिश्रमानंतर रामायण लिहिले. पण तुमचे रामायण पाहिल्यावर आता माझ्या रामायणाकडे दुर्लक्ष होईल, असे वाटते. कारण तुम्ही जे लिहिले आहेस त्या तुलनेत माझे रामायण काहीच नाही. त्यानंतर वाल्मिकींची चिंता दूर करण्यासाठी श्री हनुमानजींनी हनुमद रामायण पर्वत शिला एका खांद्यावर उचलून आणि महर्षी वाल्मिकींना दुसऱ्या खांद्यावर बसवून आपली रचना प्रभू श्रीरामचंद्र यांना अर्पण करून समुद्रात विसर्जित केली. तेव्हापासून हनुमानाने रचलेले हनुमद रामायण उपलब्ध नाही. ती अजूनही समुद्रात पडून आहे.

**५) हनुमानजी आणि अर्जुन :** आनंद रामायणात वर्णित आहे, की अर्जुनाच्या रथावर हनुमान विराजित होण्यामागील देखील कारण आहे. एकदा रामेश्वरम तीर्थमध्ये अर्जुनाचे हनुमानांशी मीलन होते. या पहिल्या भेटीत अर्जुन हनुमानजींना म्हणाला– 'अरे, प्रभू श्रीरामचंद्र आणि रावणाच्या युद्धावेळी आपण तेथे होतास?'

**हनुमानजी –** 'होय', तेव्हा अर्जुन म्हणाला – 'आपले गुरू श्रीराम हे धनुष्यधारी होते. मग त्यांना समुद्र पार करण्यासाठी दगडी पूल बांधण्याची काय गरज होती? जर मी तेथे हजर असतो तर मी समुद्रावर बाणांचा पूल बनविला असता, ज्यावर चढून तुमची संपूर्ण वानर सेनेने समुद्र पार केली असती.'

**यावर हनुमानजी म्हणतात –** 'अशक्य, बाणांचा पूल तेथे कोणतेही काम करू शकला नसता. आमचा एक ही वानर चढला असता तर तर बाणांचा पूल तुटला असता.'

**अर्जुन म्हणाला –** 'नाही, बघा हे समोर सरोवर आहे आणि आता मी त्यावर एक पूल निर्माण करतो. आपण या पुलावरुन सहज सरोवर पार करू शकता.'

**हनुमान म्हणाले –** 'अशक्य'

**तेव्हा अर्जुनने म्हटले –** 'तुमच्या चालण्याने पूल तुटला तर मी आगीत प्रवेश करीन आणि तो तुटला नाही तर तुम्हाला आगीत जावे लागेल.'

हनुमानाने हे स्वीकार केले की जर माझी दोन पावले सहन केली तर मी पराभव स्वीकारेन.'

तेव्हा अर्जुनाने आपल्या प्रचंड बाणांनी सेतू तयार केला. सेतू निर्माण होयपर्यंत हनुमान लघुरूपात होते परंतु सेतू तयार झाल्यावर त्यांनी विराट रूप धारण केले. श्रीरामांचे स्मरण करून हनुमानजी त्या बाणांच्या पुलावर चढले. पहिले पाऊल टाकताच संपूर्ण पूल डळमळू लागला, दुसरे पाऊल टाकताच तो कोसळू लागला आणि तिसरे पाऊल टाकताच तलावाचे पाणी रक्तमय झाले.

तेव्हा हनुमानजी सेतूहून खाली उतरले आणि अर्जुनाला अग्नी तयाराला सांगितले. अग्नी पेटल्यावर हनुमानजी आगीत उडी मारू लागले तेवढ्यात भगवान श्रीकृष्ण प्रकट झाले आणि म्हणाले 'थांबा!' अर्जुन आणि हनुमानजींनी त्यांना नमस्कार केला.

देवाने संपूर्ण प्रसंग जाणून घेतल्यावर म्हटले, की 'हे हनुमानजी, आपले तिसरे पाऊल सेतूवर पडले असताना मी कासव बनून सेतूखाली निजलेला होतो. आपल्या शक्तीमुळे पाय ठेवताच माझ्या कासव रूपातून रक्त निघू लागले. मी कासवरूपात नसतो तर हा सेतू तर आपल्या पहिल्या पावलातच तुटला असता'

हे ऐकून हनुमानजींना कष्ट झाले आणि त्यांनी क्षमा मागितली, की 'मी आपल्या पाठीवर पाऊल ठेवल्यामुळे मोठा गुन्हेगार ठरलो. माझा हा गुन्हा कसा दूर होईल देवा?'' तेव्हा कृष्ण म्हणाले, की हे सर्व माझ्या इच्छेने झाले आहे. काळजी करू नकोस आणि अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर तुला स्थान मिळावे, अशी माझी इच्छा आहे.




(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)